वाडा नगरपंचायत वाडा

जाहिर प्रकटन

महाराष्ट्र राज्यातील अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक होर्डिंग व पोस्टर्स बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. १५५/२०११ च्या सुनावणी संदर्भात मा.उच्च न्यायालय यांनी दि. ३१.०१.२०१७ आणि दि. १९.१२.२०२४ रोजी दिलेल्या आदेशानुसार वाडा नगरपंचायत, वाडा हद्दीमध्ये तात्पुरत्या स्वरूपातील जाहिराती घोषणा फलक होडीग व पोस्टर्स यांसाठी प्रमाणित कार्यपद्धती दि. ३१/१२/२०२४ रोजी ठरविणेत आलेली आहे. सदर प्रमाणित कार्यपद्धती कार्यालयीन वेळेत सर्वांना सामान्य प्रशासन विभागात पाहणेस मिळेल.

वाडा नगरपंचायत हद्दीमध्ये कोणत्याही नागरिकास, व्यवसायिकास, राजकीय पक्षास, राजकीय व्यक्तीस, विविध संस्थास प्राधिकारणास, व्यावसायिकास, अर्जदारास कोणतीही जाहिरात, शुभेच्छा, फलक बॅनर तात्पुरत्या स्वरूपात प्रसिद्ध करणेसाठी ऑनलाइन स्वरुपात अर्ज https://mahaulb.in या लिंक वर करता येईल किंवा ऑफलाईन अर्ज वाडा नगरपंचायत, वाडा कार्यालय आवक-जावक विभागाकडे किमान ५ दिवस आगोदर करता येईल. अर्जासोबत आधार कार्ड ची प्रत व छापवायच्या मजकुराची प्रत जोडावी. अर्जदाराने जाहिरात परवानगीसाठी अर्ज करताना नगरपंचायतीचा प्रशासकीय ठराव क्र. ५२१ दिनांक ०५/०९/२०२४ नुसार निश्चित केलेल्या ०६ जागेवरच परवानगी साठी अर्ज करावा. निश्चित केलेल्या जागांची माहिती कार्यालयीन वेळेत सामान्य प्रशासन विभागाकडे सर्वांना पाहणेस मिळेल.

IWBP पोर्टल द्वारे वाडा नगरपंचायत प्रशासकीय ठराव क्र. ५२१ दिनांक ०५/०९/२०२४ नुसार ठरवण्यात आलेली १ ते ३ दिवसांसाठी प्रति जाहिरात सर्व आकराकरीता प्रती चौ.फुट १/-रु. प्रती दिन याप्रमाणे योग्य ती फी आकारल्यानंतर NOC देण्यात येईल. सदर NOC देताना अर्जदाराचे नाव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती दर्शविणारा QR कोड सदर जाहिरात/बॅनर/ होर्डिंग/फ्लेक्स इ. वर अर्जदाराने लावणे आवश्यक आहे. तसेच सदर परवाना पोलिस स्टेशन वाडा यांचे नाहरकतीच्या अधीन राहून वैध राहील.

वाडा नगरपंचायत हद्दीतील प्रत्येक वार्डसाठी या कार्यालयाचा आदेश जावक क. ३१८/२०२५ दिनांक-१६/०१/२०२५ नुसार संबंधित वॉर्ड मधील अनधिकृत जाहिरात फलक होर्डिंग / बॅनर/फ्लेक्स बाबतचा दैनंदिन अहवाल नियंत्रण / नोडल अधिकारी, अतिक्रमण निर्मूलन विभाग यांच्या संयुक्त पथकाला सादर करणेसाठी वॉर्ड अधिकारी यांची नेमणूक केलेली आहे. तसेच मा. उच्च न्यायालय यांचे आदेशानुसार अनधिकृत जाहिरात फलक होर्डिंग / बॅनर / फ्लेक्स बाबत कार्यवाही मार्गदर्शन साठी या कार्यालयाचे पत्र जावक क्र. ३१८/२०२५ दिनांक-१६/०१/२०२५ नुसार शहरस्तरीय नागरिकांची समिती स्थापन केलेली असून त्याची माहिती कार्यालयीन वेळेत सामान्य प्रशासन विभागाकडे सर्वांना पाहणेस मिळेल.

अनधिकृत जाहिरात फलक होडींग/बॅनर/फ्लेक्स बाबत तक्रार व नियंत्रण करिता श्री.रोहन किशोर राठोड, स्वच्छता निरीक्षक यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली असून तक्रार निवारण साठी टोल फ्री क्र. १८००-२३३ -११८० आणि SMS व Whatsaap क्र. ९९२२७७०५५० हा आहे.

अनधिकृत जाहिरात फलक होर्डीग/बॅनर/फ्लेक्स लावल्यास संबंधीतावर महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपानास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यात येतील. तसेच सदर अनधिकृत जाहिरात फलक होर्डिंग/बॅनर/फ्लेक्स निष्कासित करण्यासाठी येणार खर्च व दंडाची रकम प्रति फलक रु. २००/- वसूल करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.

मनोज पष्टे
मुख्याधिकारी
वाडा नगरपंचायत, वाडा

Scanned with OKEN Scanner